# भा.कृ.अनु.प.–केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी १४ ते २० डिसेंबर २०१५ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

"हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे"

### हवामानासंबंधी सल्ला

| | डिसेंबर मधील पाऊस (मि.मी मधे) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | सल्ला |
| **महाराष्ट्र** | | | | | | | | |
| नागपूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पीक बोंड फुटण्याच्या ते वेचणीच्या अवस्थेत आहे. सर्वसाधारणपणे पीक समाधानकारक स्थितित आहे. शेतकऱ्यांना सल्ला दिला जातो कि लाल्याची पाहणी करून योग्य ती उपाययोजना करावी. लाल्याला बळी पडणाऱ्या संकरीत वाणांची निवड करावी व ती पुढच्या वर्षापासून शेतकऱ्यांनी वापरणे टाळावे. कापसाला योग्य मोबदला मिळण्यासाठी कापसाची वेचणी स्वच्छ करावी. उशीरा पेरणी केलेल्या कापसाला एक पाण्याची पाळी सोबतच १% युरिया किंवा २% डाय अमोनियम फॉस्फेटची फवारणी जेव्हा पीक फुलोऱ्यावस्थेत असेल तेव्हा करावी. तसेच जेव्हा पिकाला हिरवी बोंडे असतील तेव्हा १% युरिया आणि १% मॅग्नेशियम सल्फेट ची फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीची कामगंध सापळयाचा वापर करून पाहणी करावी जर एका सापळयात ८ पतंग/सापळा/रात्री सलग तीन दिवस जर सापडत असतील तर दिलेल्या सल्यानुसार उपाययोजना करावी. गुजरात राज्यालगतच्या जिल्हयांमध्ये तसेच ज्या शेतामध्ये मार्च किंवा एप्रिल महिन्यापर्यंत पिके राहत असल्यास बीजी–I, बीजी–II आणि गैर बी.टी. वाणामध्ये गुलाबी अळीमुळे नुकसान झालेल्या हिरव्या बोंडाची पाहणी करणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी नुकसानीची पातळी २०% पेक्षा जास्त आढळून आली आहे. त्याठिकाणी पायरेथ्राईड ची फवारणी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे बोंडाचे होणारे नुकसान टाळता येईल. स्वच्छ वेचलेल्या कपाशीची साठवणूक योग्य पध्दतीने करावी. गोणपाटाच्या पिशविचा वापर कपाशीच्या साठवणुकीसाठी टाळावा. कपाशीच्या कवडया, अवशेष तसेच रोगरहीत बियाणे साठवून ठेऊ नये. कपाशीच्या झाडाचे अवशेष जाळण्यापेक्षा त्याचे कंपोस्ट बनविणे फायदेशीर ठरते. वेचणी लवकरात लवकर संपवून डिसेंबरच्या शेवटी पीक नष्ट करावे. |
| वर्धा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| चंद्रपूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| यवतमाळ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| अमरावती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| अकोला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| बुलढाणा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| परभणी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| नांदेड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| बीड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| वाशिम | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| धुळे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| जळगांव | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| जालना | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| औरंगाबाद | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |